|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

जळगाव ११ ( ) उच्च शिक्षणासमोर आज अनेक मोठे आव्हाने उभी असतांनाही त्यातून मार्ग काढत सर्व विद्यापीठांना आपल्या विभागातील गरजा, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आणि कौशल्ये विकासन यांचा अंतर्भाव असणारा बृहत आराखडा तयार करावा अशी अपेक्षा राज्यस्तरीय विद्यापीठीय बृहत आराखडा छाननी व पुनर्तपासणी समितीची अध्यक्ष आणि माजी कुलगुरू डॉ.के.बी.पाटील यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांचे प्र-कुलगुरू, अधिष्ठाता, नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या चर्चासत्रात व्यक्त केली.

बुधवार दिनांक ११ एप्रिल रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राज्यस्तरीय विद्यापीठीय पंचवार्षिक बृहत आराखडा छाननी व पुनर्तपासणी तज्ज्ञ समिती सदस्य आणि विविध विद्यापीठांमधील प्र-कुलगुरू, अधिष्ठाता, राज्यपालांचे व्यवस्थापन परिषदेवरील नामनिर्देशित सदस्य यांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन करताना डॉ.के.बी.पाटील बोलत होते.

यावेळी मंचावर कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, समिती सदस्य तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एन.जे.पवार, डॉ.बी.एन.जगताप, प्राचार्य अनिल राव, आनंद मापुसकर तसेच उमविचे प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते.

डॉ.के.बी.पाटील म्हणाले की, आज समाजात शिक्षण हे कुचकामी समजले जात आहे. पदवीधरांना आपण कौशल्ये देवू शकत नाही त्यामुळे रोजगाराचे असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत. आपण सातत्याने सर्वांना शिक्षण, समान शिक्षण याबद्दल बोलत असलो तरी परिस्थितीत फार काही फरक पडत नाही. राज्य शासनाच्या प्राधान्यक्रमावर शिक्षण पहिल्या क्रमांकावर येत नाही तोपर्यंत परिस्थिती बदलेल असे चित्र नाही. शिक्षण सुधारले तर सर्व काही सुधरेल त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून चर्चा करण्याची गरज आहे. विद्यापीठांनी आपल्या भागातील गरजा, कौशल्याभिमुख शिक्षण तसेच रोजगाराचे प्रश्न ज्यातून सुटतील असे अभ्यासक्रम यावर भर देण्याची गरज आहे आणि त्यापध्दतीचा बृहत आराखडा तयार केला जावा. सगळ्यांच्या सहभागातूनच पुढील पाच वर्षांचा चांगला बृहत आराखडा तयार होईल अशी अपेक्षा डॉ.पाटील यांनी व्यक्त केली.

प्रा.पी.पी.पाटील यांनी नव्या काळातील गरजा लक्षात घेवून शिक्षणक्षेत्रात बदल करण्याची गरज प्रतिपादन करताना पारंपारिक निकषाच्या पलिकडे जावून व्यवसायाभिमुख शिक्षणाला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम आखावे लागतील अशी अपेक्षा व्यक्त करताना महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील नव्या पदभरतीला बंदी असल्यामुळे असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत याकडे उपस्थितांचे लक्ष वेधले.

प्रारंभी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी सुनील पाटील यांनी केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी आभार मानले. उद्घाटनानंतरच्या सत्रात प्राचार्य अनिल राव यांनी विद्यापीठ कायद्यातील तरतूदी, डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारसी आणि कालबध्दकृती कार्यक्रम याअनुषंगाने विद्यापीठाचा बृहत आराखडा कसा तयार करता येईल या संदर्भात सविस्तर सादरीकरण केले. त्यांनतर समितीसदस्य डॉ.बी.एन.जगताप यांनी तांत्रिक सत्रांमध्ये बृहत आराखड्यातील मुद्यांविषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. उमविचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.डी.आर.पाटील यांनी उमविने बृहत आराखड्यासाठी अवलंबलेल्या सर्वेक्षणाबद्दल माहिती दिली. खुल्या सत्रात प्रा.एन.जे.पवार आणि आनंद मापुसकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. विविध विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी आपल्या शंकांचे निरसन तज्ज्ञ समिती सदस्यांकडून करून घेतले.

--- २ ---

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



प्राचार्य अनिल राव यांनी यावेळी शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याचा कालबध्द कृती कार्यक्रम सांगितला तसेच बृहत आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक त्या सूचना देखील त्यांनी दिल्या.

-------

**बातमी - २**

जळगाव ११ (                ) महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाचा, इहवादाचा विचार सातत्याने मांडला. त्यांनी मांडलेल्या या विचारांवर नव्या पिढीने काम करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन साहित्यिक व विचारवंत प्रा. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतर्फे आज दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त फुले-आंबेडकरी विचार प्रवाहातील सर्वंकष मानवकल्याणाच्या दिशा या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. यावेळी मंचावर कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे, विभागप्रमुख प्रा.म.सु.पगारे उपस्थित होते.

श्री. लुलेकर पुढे म्हणाले की, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर ही मोठी शक्ती आहे, जाती-धर्माच्या आधारे त्यांच्याकडे न पाहता सामाजिक, इह-वाद, मानव कल्याणाचा विचार करणारे म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले तर देशाचे प्रश्न सुटतील हे विचार महात्मा फुले यांनी त्यावेळी मांडले होते. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहणारे महात्मा फुले हे पहिले महापुरूष होते. धर्मचिकित्सा आणि इहवादाचा विचार त्यांनी सर्व धर्मीयांसाठी मानला होता. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या प्रश्नांना हात घालायचे काम केले. याद्वारे त्यांनी सामाजिक, शैक्षणिक विचार समाजासमोर मांडून समाज प्रगती करण्यासाठी व खरा माणूस म्हणून उभे राहण्याचा मार्ग दाखविला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व्यापक विचार केले होते. शेतकऱ्यांसाठी कोकण मध्ये त्यांनी ६०० मैल पायी प्रवास करून प्रश्न मार्गी लावले होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांविषयीचा संशोधन पेपर लिहीला होता तो पेपर उत्कृष्ट संशोधन पेपर म्हणून निवडला गेला होता यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार देखील शेतकरी यांना धरून होते हे सिध्द होते. जगातला सर्वात दीर्घकाळ शेतकऱ्यांचा संप ७ वर्षे हा बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली चालला शेतकऱ्यांनी सात वर्षे शेती पडीत ठेवली होती कोणत्याही प्रकारचे उत्पन्न त्यांनी घेतले नव्हते तसेच १९३८ मध्ये मुंबई येथे पहिला शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात आला होता यात २५ हजार शेतकरी सहभागी झाले होते याचे नेतृत्वही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच शेतकऱ्यांचे खरे नेते होते असे सांगत महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य त्यांनी सभागृहासमोर मांडले.

महोत्सव आयोजनामागची भूमिका प्रा.म.सु.पगारे यांनी मांडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. दिपक खरात यांनी तर आभार प्रा.अनिल डोंगरे यांनी मानले. उद्या दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता अधिसभा सभागृहात महात्मा फुले-डॉ.बाबासाहेब आंबेडकर गीतगायन कार्यक्रम होणार असल्याची माहिती विचारधारा प्रशाळेच्या वतीने देण्यात आली.

----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ११ एप्रिल, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(सुनील पाटील)